**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ३६१/२०२३</u>**

*CNR No. MHSO060016452023*

अभिजीत सावंजी

वि.

विजय सावंजी व इतर

## <u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>

०१. प्रस्तुतचा दावा वादीने वाटप व कब्जा मिळण्यासाठी तसेच घोषणा व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. वादीचे कथन आहे की, वादमिळकती, ज्याचे वर्णन दावा परिच्छेद क्र. १ मध्ये अ ते ई असे केले आहे, या वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या एकत्रीत कुटुंबाच्या आहेत. त्याचे वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्र. १ हे मिळकती विक्री करणार असल्याचे वादी यांचे निदर्शनास आल्याने त्यांनी जाहीर नोटीस वर्तमानपत्रात प्रकाशीत केलेली आहे. तसेच दुय्यम निबंधक कार्यालयात देखील तशी नोटीस नोंदणीकृत केलेली आहे. असे असताना प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना वाद मिळकतीपैकी मिळकत क्र. अ व ब विक्री केली. तसेच प्रतिवादी क्र. ४ ने प्रतिवादी क्र. ३ यास वादमिळकत अ विक्री केली. त्या खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र. ३ हे अडथळा करु लागल्याने वादीस हा दावा वाटणी, घोषणा, मनाई हुकूम व कब्जासाठी दाखल करावा लागला आहे. निशाणी क्र. ५ च्या अनुषंगाने वादी यांनी युक्तीवादादरम्यान केवळ प्रतिवादी क्र. ३ विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मागितलेला आहे. या अनुषंगाने त्यांनी खालीलप्रमाणे युक्तीवाद केला.

०२. वादीचे विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादमिळकत क्र. अ व ब मध्ये वादी हे रहात आहेत. वादमिळकतीचे वाटप झालेले नाही. यापुर्वी प्रतिवादी क्र. १ यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने वादी हे दरमहा रक्कम रु. १०,०००/– प्रतिवादी क्र. १ यांना देत आहेत. प्रतिवादी क्र. १ हे वादमिळकत विक्री

करण्याच्या तयारीत असल्याने वादीने वर्तमानपत्रात जाहीर प्रकटन देऊन वादाची माहिती सार्वजनिक केली होती. तसेच मंगळवेढा येथील दुय्यम निबंधक कार्यालयात सदरील मिळकतीबाबत वादाची नोटीस नोंदणीकृत केली होती. असे असताना प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक २०.०७.२०२३ रोजी प्रतिवादी क्र. ३ यांना वादमिळकतीपैकी मिळकत क्र. ब म्हणजेच भूपामन गट क्र. ८४७ विक्री केली. तसेच पुर्वीच्या विक्रीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांना दिनांक १९.०७.२०२३ रोजी वादमिळकत क्र. अ विक्री केली. या खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र. ३ हे वादी यांना वादमिळकत क्र. अ व ब मधून बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सबब, प्रतिवादी क्र. ३ विरुध्द अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात यावा, जेणेकरुन वादी यांचा ताबा जाणार नाही.

०३. वादीच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने कागदपत्रे पाहिली. असे दिसते की, वादमिळकत अ व ब प्रतिवादी क्र. १ याचे नावे आहे. सदरील मिळकत एकत्रीत कुटुंबाची आहे अथवा प्रतिवादी क्र. १ यांची स्वकष्टार्जित आहे हे पुराव्याअंती ठरेल. तथापि, उपरोक्त मिळकत क्र. अ व ब मध्ये वादी रहातात ही बाब प्रथमदर्शनी दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मंगळवेढा येथे दाखल असलेल्या नियमित दिवाणी दावा क्र. ९५/२०२२ वरुन दिसते. त्यामध्ये स्पष्ट नमूद आहे की, तिस–या मजल्यावर वादी व प्रतिवादी राहण्यास आहेत. म्हणजेच मिळकत क्र. अ व ब मध्ये वादी हे रहात असल्याचे याक्षणी आढळते. या व्यतिरीक्त असे दिसते की, प्रतिवादी क्र. १ यांचेशी इतर कोणीही खरेदीविक्रीचा व्यवहार करु नये याकरीता वादीने वर्तमानपत्रात जाहीर प्रकटन दिलेले होते. तसेच दुय्यम निबंधक कार्यालयात वादाची नोंदणी ही दिनांक १२.०४.२०२३ रोजी केलेली होती. असे असताना खरेदीखत झाल्याचे दिसते. सबब, उपरोक्त सर्व बाबी पहाता, प्रथमदर्शनी असे दिसते की, वादमिळकतीच्या अनुषंगाने कायदेशीर हक्क जाहीरपणे उच्चारण्याचा प्रयत्न वादीने केलेला आहे. नियमित दिवाणी दावा क्र. ९५/२०२२ मधील प्रतिवादी क्र. १ याचे परिच्छेद क्र. १ मधील कथन पहाता, उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. ३ विरुध्द तुर्तातुर्त मनाई

हुकूम देणे आवश्यक असल्याचे दिसते. मनाई हुकूम न दिल्यास वादीचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र. ३ यांना पुढील तारखेपर्यंत वादीच्या वादमिळकत क्र. अ व ब मधील ताब्यास हरकत अडथळा करण्यास तुर्तातुर्त एकतर्फा मनाई करण्यात येते.

२. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३ प्रमाणे अनुपालन करुन त्याचा अहवाल न्यायालयात त्या नियमाप्रमाणे ताबडतोब दाखल करावा.

३. वादी यांनी विशेष बेलीफ भत्ता भरावा व प्रतिवादी यांचेवर समन्स व नोटीस बजावणीसाठी लखोटा हाती घ्यावा.

४. आदेश खुल्या न्यायालयात जाहीर.

५. हा आदेश संगणकात अपलोड करावा जेणेकरुन संबंधीताच्या निदर्शनास येईल.

६. प्रकरणात पुढील तारीख ३०.०८.२०२३ ही ठेवण्यात येते.

NILESH SUBHASH BUDRUK
Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2023.08.24 18:12:58 +0530

दि. २४.०८.२०२३

( नीलेश सु. बुद्रुक )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | 2nd Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 24/08/2023 |
| Order uploaded on | : | 24/08/2023 |